# नवी मुंबई महानगरपालिका

महापालिका सचिव कार्यालय,
नवीन मुख्यालय, ३ रा मजला,
बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४.
दिनांक ०२ सप्टेंबर २०१४.

## -: सर्वसाधारण सभेची पुरवणी नोटीस :-

नवी मुंबई महानगरपालिकेच्या **शनिवार, दिनांक ०६ सप्टेंबर २०१४ रोजी सकाळी ११.०० वाजता भरणा-या सप्टेंबर महिन्याच्या सर्वसाधारण सभेमध्ये पुढील जादा विषय क्र. १४ ते १८** विचारात घेण्यासाठी प्रसृत करण्यात येत आहेत :-

**मा. महापौरांच्या आदेशावरुन,**
**सही/-**
**(चित्रा बाविस्कर)**
**महानगरपालिका सचिव(प्र.),**
**नवी मुंबई महानगरपालिका.**

---

**१४ ते १६. सौ. मोनिका लक्ष्मीकांत पाटील, यांजकडून :-**
(१४) प्र. क्र. २१ तळवली नाका येथील झोपडपट्टी (नोसिल नाका) येथे एस.आर.ए. योजना राबवून झोपडपट्टीचे पुर्नवसन करणे. (१५) प्र. क्र. २१ अंतर्गत शंकरबुवावाडी येथील गायत्री अपार्टमेंट तलावपाली रोड जवळ हायमास्ट लावणे. (१६) प्र. क्र. २१ घणसोली गावात जाताना अर्जुनवाडी जवळ जो नाला आहे तो अरुंद आहे. शिवाय शाळेतील मुले-गाडया यांची रहदारी याठिकाणी जास्त प्रमाणात असते. तसेच चालण्यासाठी असलेला फुटपाथही खूप लहान आहे. त्यामुळे येथे नेहमी अपघात होतात. तरीही नाल्याची रुंदी व उंची वाढवून नाला नव्याने बांधणे.

**१७. श्री. अनंत लक्ष्मण सुतार, यांजकडून :-**
सद्यस्थितीत औद्योगिक क्षेत्रातील मंदी लक्षात घेता स्थानिक संस्था कराचा कर २% वरुन १.५% करण्यात यावा. तसेच इतरही सर्व वस्तुंचा स्थानिक संस्था कर जास्त असेल तर तो ही १.५% इतका करण्यात यावा. उपकराची थकित वसुली सुलभ व्हावी तसेच आर्थिक मंदित असलेल्या व्यापारी/उद्योजक वर्गाचा आर्थिक बोजा कमी व्हावा यासाठी ज्या व्यापा-यांची निर्धारणा झाली असेल व व्याज तसेच दडांची रक्कम भरणे बाकी असेल किंवा जे व्यापारी निर्धारणा करुन मुळ रक्कमेचा भरणा करतील किंवा मुळ रक्कमेचा भरणा केला असेल त्यांच्या निर्धारणा आदेशात लावण्यात आलेल्या व्याज ५०% व दंडात १००% सवलत देणारी अभय योजना अंमलात आणावी.

**१८. श्री. वैभव नारायण गायकवाड, यांजकडून :-**
नवी मुंबई महानगरापालिकेच्या विकास नियंत्रण नियमावलीनुसार औद्योगिक विभागातील जागेवर रहीवासी/वाणिज्य वापर करण्यास परवानगी नाही. परंतु औद्योगिक विभागातील जागेवर रहीवासी अथवा वाणिज्य वापर करण्याची तरतुद ठाणे जिल्हयातील इतर महानगरपालिकेच्या नियमावलीमध्ये अनुज्ञेय असून राज्यातील इतर महानगरपालिका तसेच शहरांच्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये अशी तरतुद आहे. याप्रमाणे नवी मुंबई महानगरपालिकेच्या औद्योगिक विभागातील जागेवर रहीवासी/वाणिज्य वापर अनुज्ञेय करणेसाठी महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये आवश्यक फेरबदल करुन या प्रकारचे नियम समाविष्ट करण्यात यावे जेणेकरुन औद्योगिक वापर बंद पडल्यास/स्थलांतरीत झाल्यास तेथे काही अटी/शर्तीस अधिन राहून रहिवासी/वाणिज्य वापर अनुज्ञेय करता येईल.